गुरुवार, २१ नोव्हेंबर २०१९ | वर्ष : ५ अंक : २९५ | पृष्ठे १२ | मूल्य : ४.०० रुपये | ★★ पुणे आवृत्ती | संस्थापक संपादक : बाळ ठाकरे

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

सामना



# ■ एरोबिकमध्ये वसुंधरा दीक्षितला कांस्यपदक

पुणे : सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन (सीबीएसई)तर्फे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत वानवडी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या वसुंधरा दीक्षितने कांस्यपदक पटकावले. एरोबिक प्रकारात वसुंधराने ही चमकदार कामगिरी केली. नगर येथील समता इंटरनॅशनल स्कूल येथे १० ते १२ नोव्हेंबर या कालावधीत ही स्पर्धा पार पडली. देशभरातील ८६ शाळांमधील स्पर्धक यात सहभागी झाले होते. वसुंधरा दीक्षित सिटी इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता नववीत शिकत आहे.